रजेगाव काटी उपसा सिंचन योजना ता. गोंदिया जि.गोंदिया तृतीय सुधारीत प्रशासकिय मान्यता देण्याबाबत

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर**

**महामंडळाचा निर्णय क्र. २६ विपाविम/कांता-२/ तृतीय सुप्रमा/ रजेगाव काटी उसिया (धा.क्र.३०/२०१८)/२०१९**
**दि. २१/०१/२०१९**

**पहावे** **महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०१५/(३५/२०१५)/ जसं(अ) मंत्रालय , मुंबई दि. ०९ सप्टेंबर २०१५.**

रजेगाव काटी उपसा सिंचन योजना ता. गोंदिया जि.गोंदिया या योजनेस शासन निर्णय पाटबंधारे विभाग क्र.रजेगाव १०९८/७८/(१८/९८ )/ज.स.अ. / मंत्रालय मुंबई दि. ३०-०९-१९९९ (१९९६-९७ च्या दरसूचीवर आधारित ) रु. २३३८.०० लक्ष ( तेवीस कोटी अडतीस लक्ष ) किंमतीस मूळ प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

तदनंतर महामंडळाचे निर्णय क्र. विपाविम /कांता-१/१६५४ / प्रथम सुप्रमा / रजेगाव काटी /२००८ दिनांक ३१.०३.२००८ अन्वये (दरसुची २००५-०६ वर आधारीत) रु. ४१७८.०० लक्ष (रु. एकेचाळीस कोटी अठ्यात्तर लक्ष फक्त ) किमंतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. तदनंतर शासन निर्णय क्र.सुप्रमा/ २०१०/८८४/(३१३/१०)/जसंअ/ मंत्रालय मुंबई दि. ३१-०३-२०११ अन्वये (दरसूची २०१०-११ वर आधारित ) रु ८७४३.०० लक्ष ( रु. सत्याऐंशी कोटी त्रेचाळीस लक्ष फक्त) किमतीस द्वितीय सुधारित प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ, जास्त दराच्या निविदा स्विकृतीमुळे वाढ, भुसंपादन खर्चातील वाढ. संकल्पनातील बदल इतर कारणे व अनुषंगिक खर्चातील वाढ इत्यादी करणामुळे वाढ झाली असुन योजनेची अद्यावत किंमत मंजूर द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता किमंतीच्या तुलनेत दहा टक्याहुन अधिक वाढत असल्यामुळे योजनेस पुन्हा सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये रजेगाव काटी उपसा सिंचन योजना ता. गोंदिया जि.गोंदिया या योजनेच्या (दरसूची २०१६-१७ वर आधारित ) एकुण अंदाजित किंमत रु.१०८३६.०० लक्ष (एकशे आठ कोटी छत्तीस लक्ष रुपये फक्त ) खर्चास तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रु. १००१५.०० लक्ष ( शंभर कोटी पंधरा लक्ष रुपये फक्त) कामा प्रित्यर्थ व रु. ८२१.०० लक्ष (आठ कोटी एकवीस लक्ष रुपेय फक्त) अनुषंगिक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरित कामासाठी सन २०१६-१७ या वर्षाच्या दरसुचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतुदीचा गोषवारा परिशिष्ठ -१ मध्ये संलग्न आहे.

**ठळक बाबी**

| | |
|---|---|
| अ. योजनेचे सिंचन क्षेत्र | ३७३५ हेक्टर |
| ब. योजनेचे सिंचन क्षमता | ५६०३ हेक्टर |
| क. योजनेचे लाभव्यय गुणोत्तर | २.४६ (मापदंड - १.५० पेक्षा जास्त) |

हा निर्णय संदर्भा मध्ये उल्लेखित शासन परिच्छेद १.३ नुसार नियामक मंडळच्या दि. २७.१२.२०१८ रोजी संपन्न ७२ व्या बैठकीय मान्य झालेल्या ठराव क्र. ७२/३ चे अनुषंगाने सचिव उपसमितीने व राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या तपासणी अहवालातील मुद्दा क्र. २६ व २७ च्या पुर्ततेच्या अटीच्या अधिन राहुन महामंडळास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.